# बृहन्मुंबई महानगरपालिका

सार्वजनिक आरोग्य खाते (संनिरीक्षण)

क्र.एचओ/१०६८४/एएचओएस दि. १५.०९.२०२५

## जाहिरात

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सार्वजनिक आरोग्य खात्यांतर्गत कार्यकारी आरोग्य अधिकारी यांच्या अधिपत्याखालील सहाय्यक आरोग्य अधिकारी (संनिरिक्षण) विभागात खालील तक्त्यात नमूद संवर्गाची रिक्त पदे कंत्राटी तत्वावर भरण्यासाठी मा. महानगरपालिका आयुक्त यांची क्र. एमजीसी/ एफ/६९६२ दि.२५.०६.२०२५ अन्वये दि. ०१.१०.२०२५ ते ३०.०९.२०२७ या कालावधीकरीता प्रत्येकी १७९ दिवसानंतर ०१ दिवसाचा सेवा खंड देऊन कंत्राटी तत्वावर किंवा नियमित तत्वावर सदर पदे भरेपर्यंत यापैकी जे अगोदर असेल एवढया कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने रिक्त पदे भरण्याकरीता मंजूरी प्राप्त झाली आहे. सदर मंजुरीच्या अनुषंगाने खालील अर्हता धारण करणा-या व अटींची पुर्तता करणाऱ्या इच्छूक उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने गुगल फॉर्म https://forms.gle/vNJturwcCLGZPRcC9 या गुगल लिंकद्वारे दि. १७.०९.२०२५ ते दि. २९.०९.२०२५ रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत अर्ज भरावयाचे आहेत. तसेच अर्ज व प्रमाणपत्राच्या मूळ प्रती साक्षांकित व छायांकित प्रतीसह कागदपत्रांच्या पडताळणीच्यावेळी घेऊन यावे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या http://portal.mcgm.gov.in या संकेतस्थळावर सदरची संपूर्ण जाहिरात अटी व शर्ती सह तसेच वैयक्तिक माहितीप्रपत्र प्रसिध्द करण्यात येत आहे. उमेदवारांनी अर्ज सादर करण्यापूर्वी जाहिरातमधील सूचना, अटी व शर्ती काळजीपूर्वक वाचाव्यात. सोबत जोडण्यात आलेल्या विहीत नमून्यातील वैयक्तिक माहितीप्रपत्र उमेदवारांनी पडताळणीच्यावेळी सादर करावे. उमेदवारांची निवड यादी दि. ०६.१०.२०२५ रोजी सूचनाफलकावर प्रसारीत केली जाईल.

कंत्राटी पध्दतीने भरावयाच्या पदाचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ. क्र. | पदनाम | एकूण पदे | शैक्षणिक अर्हता | वयोमर्यादा | मासिक मानधन |
|---|---|---|---|---|---|
| १. | संनिरिक्षण अन्वेषक | २५ | १. उमेदवार हा इंग्रजी, हिंदी व मराठी विषयासह मान्यताप्राप्त शिक्षण मंडळाची माध्यमिक शालांत किवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षा उत्तीर्ण असावा.<br>२. उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षेत किमान १०० गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय घेऊन उत्तीर्ण झालेला असावा .<br>३. उमेदवार मान्यताप्राप्त शासनसंस्थेतून **स्वच्छता निरीक्षक पदविका परीक्षा** उत्तीर्ण असावा.<br>४. उमेदवार डी.ओ.ई.ए.सी.सी.सोसायटीचे किंवा सी.सी.सी. किंवा 'ओ' स्तर किंवा 'ए' स्तर किंवा 'बी' स्तर किवा 'सी' स्तर, स्तरावरील प्रमाणपत्रधारक किवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे एम.एस.सी.आय.टी. किवा जी.इ.सी.टी. चे प्रमाणपत्रधारक असावा. | उमेदवाराचे वय खुल्या वर्गासाठी 38 वर्षे व मागासवर्गीय प्रवर्गासाठी 43 वर्षापेक्षा जास्त नसावे. | रु. १७०००/- |

**निवडीचे निकष व कार्यपध्दती:**

१. सदर पदाची विहित केलेली स्वच्छता निरिक्षक पदविकेच्या गुणवत्तेच्या आधारे उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. समान गुण असल्यास प्रथमत: बारावीच्या गुणांच्या आधारे, नंतर दहावीच्या गुणांच्या आधारे व त्यानंतर वयाच्या ज्येष्ठतेनुसार गुणवत्ता यादीतील उमेदवारामधून निवड यादी तयार करण्यात येईल.

२. अर्ज करण्याचा कालावधी दि. १७.०९.२०२५ ते दि. २९.०९.२०२५ सकाळी ११ वाजेपर्यंत.

**<u>सर्वसाधारण अटी:</u>**

१. उमेदवार कंत्राटी संनिरीक्षण अन्वेषक या तत्सम पदाकरीता विहित केलेल्या अर्हता धारण करणारा असावा.

२. उमेदवाराचा भ्रमणध्वनी क्रमांक, ई-मेल आयडी आणि पत्रव्यवहाराचा पत्ता सुस्पष्ट व पूर्ण असावा.

३. पात्र उमेदवारांना कंत्राटी नियुक्ती देण्यापूर्वी संबंधीत पोलीस ठाण्याकडून उमेदवाराचे चारित्र्य व पूर्वचारित्र्य प्रमाणपत्र प्राप्त करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

४. कंत्राटी कर्मचा-यांना देण्यात येणा-या ठोक मानधना (रु.१७,०००/-) व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचा महागाई भत्ता, घरभाडे भत्ता इत्यादी अनुज्ञेय असणार नाही. तसेच सदर उमेदवारांसाठी निवासस्थानाची कोणतीही व्यवस्था केली जाणार नाही.

५. महिला उमेदवारांनी विवाह नोंदणी प्रमाणपत्र, नावात बदल झाल्याचे राजपत्र सादर करावे. तसे नसल्यास विवाहित महिला उमेदवार विवाहापूर्वीच्या नावाने अर्ज करु शकतात.

६. उमेदवाराला कोणत्याही न्यायालयाने नैतिक अध:पतन किंवा फौजदारी स्वरुपाच्या खटल्यात शिक्षा दिली असल्यास, तसेच उमेदवाराविरुध्द पोलिस चौकशी/न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्यास/शिक्षा झालेली असल्यास उमेदवाराने त्याबाबत माहिती देणे आवश्यक आहे.

७. त्यांच्या कंत्राटी सेवेच्या कालावधीमध्ये दर १७९ दिवसानंतर ०१ दिवसाचा सेवा खंड देण्यात येईल.

८. कंत्राटी कालावधीत त्यांचे काम समाधानकारक न आढळल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता समाप्त करण्याचे अधिकार सहाय्यक आरोग्य अधिकारी (संनिरिक्षण) यांच्याकडे राहतील.

९. त्यांची नेमणूक करार पध्दतीची असल्यामुळे त्यांना कोणत्याही न्यायालयात जाता येणार नाही.

१०. नियुक्तीच्या वेळी उमेदवाराकडून रु.५००/- च्या बॉन्ड पेपरवर करारनामा करुन घेण्यात येईल.

११. त्यांची विना परवानगी गैरहजेरी विनावेतनी गैरहजेरी (LWP) करण्यात येईल.

१२. सदर कंत्राटी तत्वावरील पदधारकाच्या नियुक्ती कालावधीमध्ये उमेदवाराने शिस्तभंग केल्याचे निदर्शनास आल्यास त्याची नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल.

१३. कोणत्याही कारणास्तव निवड झालेल्या उमेदवारास पदाचा राजीनामा द्यावयाचा असल्यास त्याने तीस दिवसांची पूर्वसूचना देणे बंधनकारक आहे.

१४. निव्वळ कंत्राटी नियुक्ती झालेल्या उमेदवारास महानगरपालिकेमध्ये कायमस्वरुपी सेवेसाठी कोणताही हक्क सांगता येणार नाही. तसेच त्यांना नियमित सेवेचे कोणतेही फायदे अनुज्ञेय असणार नाहीत.

१५. निवडप्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती/प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर केल्यास किवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्यांची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल. तसेच नियुक्ती झालेली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यांत येईल.

१६.प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव निवडप्रक्रिया कोणत्याही वेळेस कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार कार्यकारी आरोग्य अधिकारी यांना आहेत.

१७.निवड झालेल्या उमेदवाराची बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही रुग्णालय/ दवाखाना/ विभाग कार्यालय/ सेंटीनेल सेंटर येथे नियुक्ती करण्यात येईल तसेच नेमून दिलेल्या कार्यवेळेत काम करावे लागेल.

१८.निवड झालेल्या उमेदवारला नियुक्तीनंतर मुंबई महापालिका (सेवा) नियम १९८९ तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका (वर्तणूक) नियम १९९९ लागू होणार नाहीत.

१९.अंतिम निवड यादी सहाय्यक आरोग्य अधिकारी संनिरीक्षण कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसारित करण्यात येईल.

२०.सार्वजनिक आरोग्य खात्यात या पूर्वी काम केलेल्या उमेदवाऱ्यांच्या बाबत काही तक्रार यापूर्वी अथवा सद्यस्थितीत प्राप्त झाल्यास सदर तक्रारीची शहानिशा करून संबंधित उमेदवारास पात्र अथवा अपात्र ठरविण्याचे अधिकार कार्यकारी आरोग्य अधिकारी यांना असतील.

**विशेष सूचनाः**

१. यापूर्वी संबंधित कार्यालयात व अन्य ठिकाणी सादर केलेले/प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुस-या संस्थेला अर्ज विकणे, स्विकारणे इत्यादींचा अधिकार दिलेला नाही याची कृपया नोंद घ्यावी.

२. टपालाने आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

**सही/- दि. १५.०९.२०२५**
**डॉ. दक्षा शाह**
(**कार्यकारी आरोग्य अधिकारी**)

**वैयक्तिक माहितीपत्र (BIO-DATA)**

प्रति,
**सहाय्यक आरोग्य अधिकारी यांचे कार्यालय,**
कक्ष क्र. ५, कस्तुरबा रुग्णालय,
साने गुरुजी मार्ग, चिंचपोकळी, मुंबई ४०० ०१२

**पदाचे नांव : कंत्राटी संनिरिक्षण अन्वेषक**

1. (अ) संपूर्ण नांव (आडनांव प्रथम) (मराठीत) : ____________________

   (ब) वडिलांचे/पतीचे संपूर्ण नांव : ____________________

   (क) विवाहापूर्वीचे संपूर्ण नांव (महिलांकरिता) : ____________________

2. पत्ता व दूरध्वनी / मोबाईल क्र. : ____________________
____________________
____________________

3. जात प्रवर्ग : ____________________

4. लिंग : ____________________

5. अ) जन्म दिनांक : दिनांक ☐☐ महिना ☐☐ वर्ष ☐☐☐☐

   ब) दि. 01.01.2025 रोजी असलेले वय __________ **वर्षे** __________ **महिने** __________ **दिवस**

6. शैक्षणिक अर्हता :-

| **शेक्षणिक अर्हता** | **शालांत परिक्षा मंडळ/विद्यापीठाचे नांव** | **गुणांचा तपशील** | | **टक्के वारी** | **शालांत परिक्षेतील गुण** | | **उत्तीर्णतेचे प्रयत्न** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **प्राप्त गुण** | **पैकी** | | **मराठी** | **इंग्रजी** | |
| **दहावी** | | | | | | | |
| **बारावी** | | | | | | | |
| **पदवी** | | | | | | | |
| **स्वच्छता निरिक्षक पदविका** | | | | | | | |

7. अनुभव : ____________________

8. संगणकविषयक ज्ञान : **आहे / नाही.**
MS-CIT किंवा शासनाने विहित : **आहे / नाही.**
केलेल्या संगणकविषयक अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र

9. स्थानिक पोलिस ठाण्याचा संपूर्ण पत्ता : ____________________

____________________

10. उंची _____ **फूट** _____ **इंच** _____ वजन _____ **कि.ग्रॅम** शरीराची ठेवण : **किरकोळ/मध्यम/सुदृढ**

11. वर्ण : __________ नेत्र वर्ण : __________ वैयक्तिक खूण : __________

12. उमेदवार सध्या नोकरी करीत आहे किंवा नाही? - **होय / नाही.**

असल्यास त्याबाबतचा तपशिल :

____________________

____________________

13. उमेदवाराविरुद्ध पोलिस चौकशी / न्यायालयिन प्रकरण प्रलंबित / प्रस्तावित आहे का? - होय/नाही
असल्यास त्याबाबतचा तपशिल :-

____________________

14. ____________________

15. उमेदवारास पूवी शिक्षा झाली होती का? - **होय / नाही.**
शिक्षा झाली असल्यास, शिक्षेचा तपशिल :

____________________

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक असे जाहिर करतो/करते की, वरील माहिती जाणीवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून, खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांवर व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. यापैकी कोणतीही माहिती खोटी आढळल्यास माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी उमेदवारी रद्द केल्यास माझी काहीही तक्रार राहणार नाही.

दिनांक : **आपला नम्र,**

(**अर्जदाराची सही**)
(अर्जदाराचे नांव)